# प्रेस नोट

**मटका किंग म्हणुन प्रसिद्ध असलेल्या बबलु नायर याचे जुगार अड्डयावर छापा टाकुन ६३ जनांना अटक**

दिनांक २७/०७/२०१९ रोजी खडकी रेल्वे स्टेशनचे पाठीमागे साई मंदिर चौक येथे पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीरपणे चालत असलेल्या जुगार अड्डयाची माहीती मिळाल्याने रात्रौ २०.०० वा चे सुमारास मा. पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पुणे शहर श्रीमती स्वप्ना गोरे मॅडम यांनी सदर ठिकाणी स्टाफसह जावुन छापा टाकला असता सदर छाप्यामध्ये बेकायदेशीरपणे कल्याण ओपन मटका, तीन पत्ती, रम्मी असे बेकायदेशीर जुगार खेळत असताना मिळुन आल्याने दोन पंचासमक्ष पंचनामा करुन सदर जुगार अड्डयाच्या ठिकाणावरुन जुगार खेळणा-या १)नासिर माहीद्दीन कुरेशी २)संदिप शिवाजी आठवले ३)बिलाल उस्मान शेख ४)ताहीर मोहम्मद अली अन्सारी ५)हेमंत रामदास लोंढे ६)अकबर सरवर बागवान ७) हर्षद अरुण कांबळे ८) निलेश निवृत्ती चव्हाण ९) राहुल पवनकुमार लालवानी १०)अनिकेत बाळासाहेब इंगवले सर्व राहणार खडकी व इतर ५३ असे एकुण ६३ जणांना ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे एकुण २,२९,०१३/- रुपये रोख रक्कम, जुगाराचे साहीत्य, ४५ मोबाईल फोन व इलेक्ट्रीक नोटा मोजण्याची मशीन असे एकुण २,७७,५१३/- रुपयांचा मुद्देमाल मिळुन आाला. सदरच्या छाप्यात जुगाराच्या साधणासह स्वताच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे जुगार खेळत व खेळवीत असताना मिळुन आल्याने सदरच्या जुगार अड्डयाचे मालक बबलु सबस्टीन नायर राहणार खडकी याचेसह एकुण ६३ इसमांवरती खडकी पोलीस स्टेशन गुरनं २७३/२०१९ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४,५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरचा पुढिल तपास पोलीस उप निरीक्षक गिरी खडकी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सरदची कारवाई मा. पोलीस आयुक्त सो पुणे शहर व पोलिस सहआयुक्त सो पुणे शहर यांचे आदेशांन्वये अप्पर पोलीस आयुक्त सो गुन्हे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे परिमंडळ १ पुणे शहर,पोलीस उप निरीक्षक वाय पी सुर्यवंशी ,पोलीस हवालदार सचिन इनामदार,पोलीस नाईक जगदाळे, पोलीस नाईक पालवे, पोलीस शिपाई गायकवाड, पोलीस शिपाई साळुंके, पोलीस शिपाई अनिल गायकवाड, पोलीस शिपाई देशमुख, पोलीस शिपाई भोकरे असे पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथक यांच्या संयुक्त पथकाने सदरची कारवाई केली.